# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक ९३/२०२०**

**विषय :— कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या मे—जून, २०२० सत्र पध्दती अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या नियोजनातील विशेष तरतूदीबाबत...**

**संदर्भ :— १) युजीसी गाईडलाईन्स पत्र क्र.डी.डी.नं, एफ—१/२०२०(सचिव),दि.२९/०४/२०२०.**

**२) युएनआय/२०२०/बैठक/विशि—१/४१३१/ए, दिनांक ८ मे, २०२०.**

कोव्हीड—१९ च्या प्रादुर्भावामुळे व त्यानुसार झालेल्या टाळेबंदीमूळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकांचे नियोजन करण्याकरीता राज्य शासनाने समिती गठित केली होती. सदर समितीने केलेल्या शिफारशी शासनाने स्विकृत केल्याचे व त्या शिफारशींच्या अनुषंगाने विद्यापीठांनी आवश्यक कार्यवाही करुन अधिनस्त महाविद्यालयांना कळविण्याचे संदर्भीय पत्राद्वारे सूचित केलेले आहे.

सदर शिफारशींमध्ये नमूद केलेल्या तरतूदी तसेच मार्गदर्शक तत्वे स्विकारुन त्याअनुषंगाने कार्यवाहीची प्रक्रिया विद्यापीठाने सुरु केलेली आहे. दरम्यान यासंदर्भात विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर करण्याच्या दृष्टीने उपरोक्त अहवालात नमूद केलेल्या बाबींचे सहजसुलभ आकलन होण्यासाठी सदर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. यांसंबंधी काही अडचणी असल्यास महाविद्यालयातील कर्मचारी विद्यापीठ परीक्षा विभागात संपर्क साधु शकतील. यासंबंधीची अंतिम तपशिलवार कार्यपध्दती संबंधित अधिकार मंडळाच्या मान्यतेने जाहीर करण्यात येईल.

## अ) परीक्षा आवेदनपत्र (Examination Forms)

१) मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता विविध अभ्यासक्रमाच्या विविध सत्रातील सर्व पात्र व इच्छूक विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्राची (Examination Forms) प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य आहे.

२) ज्या विद्यार्थ्यांनी मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता निर्धारीत वेळेत यापूर्वीच परीक्षा आवेदनपत्राची प्रक्रिया पूर्ण केलेली आहे, त्यांना पुन्हा आवेदनपत्र भरण्यांची आवश्यकता नाही.

३) मे—जून, २०२० मध्ये आयोजित परीक्षांकरीता विविध अभ्यासक्रमातील, विविध सत्रातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्रे अद्याप सादर केलेली नाहीत, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा आवेदनपत्र भरण्याकरीता लिंक दिनांक १९/०५/२०२० ते २८/०५/२०२० या कालावधीत उपलब्ध राहील.

४) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्द्तीने आवेदनपत्र भरुन विहीत आवेदनशुल्क विद्यापीठाकडे ऑनलाईन गेटवे मार्फत भरावयाचे आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने भरलेले आवेदनपत्र महाविद्यालयाकडून इनवर्ड झाल्यानंतर आवेदन पत्राची प्रक्रिया पूर्ण होईल. यासंदर्भात रेड झोन मधील महाविद्यालयांची काही विशेष अडचण असल्यास त्यांनी विद्यापीठास संपर्क करावा.

५) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्द्तीने भरलेल्या आवेदनपत्रांचा गोषवारा स्वरुपातील तपशिल महाविद्यालयांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करण्यात येईल, जेणेकरुन इनवर्ड करण्याची प्रक्रिया सुलभरित्या पूर्ण करता येईल. महाविद्यालय स्तरावर ही आवेदनपत्रे दिनांक ३०/०५/२०२० पर्यंत इनवर्ड करणे अनिवार्य राहील.

६) या संपूर्ण प्रक्रियेत कुठल्याही प्रकारचे विलंब अथवा अंतिविलंब शुल्क सद्यपरिस्थितीत विशेष बाब म्हणून मे–जून, २०२० सत्रापुरते आकारले जाणार नाही. ज्या विद्यार्थ्यांना आवेदनपत्रात यापूर्वी असे विलंब शुल्क लागू झाले आहे, तसेच त्यांनी ते महाविद्यालयामध्ये भरले आहे अशा शुल्काचा परतावा करण्यासंबंधी विद्यापीठाकडून स्वतंत्रपणे योग्य वेळी परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

**ब) अंतिम सत्राचे विद्यार्थी वगळता सत्र पध्दतीमधील इतर विद्यार्थ्यांच्या परीक्षा :**

१) अंतिम सत्र वगळता इतर विद्यार्थ्यांच्या लेखी अथवा प्रात्याक्षिक अशा कुठल्याही परीक्षा केंद्रावर पारंपारिक पध्दतीने हजर राहून प्रत्यक्ष परीक्षा घेतल्या जाणार नाहीत. याबाबत त्यांच्या परीक्षेसंबंधी शासन निर्देशामध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व प्रक्रिया पुर्ण करून त्याचे निकाल जाहीर केले जातील.

२) उपरोक्त विद्यार्थ्यांच्या विविध विषयांच्या परीक्षांचे निकाल शासन निर्देशामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित विषयातील ग्रेड ही ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर आधारीत (उपलब्ध असल्यास) व ५० टक्के मागील लगतच्या सत्रातील परीक्षेचे गुण (उपलब्ध असल्यास) यावर आधारीत राहील. अपवादात्मक/अनियमित प्रकरणांबाबत करावयाची कार्यवाही स्वतंत्रपणे सुनिश्चित करण्यात येईल.

३) उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांच्या नियमित प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा होणार नाहीत. या परीक्षांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर या सत्रात पूर्वीच केलेले अंतर्गत मूल्यमापन, जर्नलस, टर्मवर्क, मौखिक परीक्षा अथवा अभ्यासक्रमात नमूद तत्सम तरतूदी यांच्या आधारावर केले जाईल.

४) उपरोक्त विद्यार्थ्यांच्या कोणत्याही बॅकलॉग विषयांची परीक्षा जुलै, २०२० मध्ये होणार नाही. अशा विद्यार्थ्यांची बॅकलॉग विषयांची परीक्षा पुढे नविन सत्र सुरु झाल्यानंतर १२० दिवसांच्या कालावधीत घेण्यात येईल. जर अशा विद्यार्थ्यांना जुलै, २०२० परीक्षेच्या निकालानंतर परफॉर्मन्स इम्प्रुव्हूमेंट हवी असल्यास त्याकरीता पुढील सत्रामध्ये संधी देण्यात येईल.

**क) अंतिम सत्रातील नियमित, पुन:परीक्षार्थी व अनुशेषीत विद्यार्थी (रेग्युलर, रिपीटर आणि बॅकलॉग) :**

१) अंतिम सत्रात असलेल्या विद्यार्थ्यांच्या अंतिम सत्रातील विषयांची तसेच सर्व सत्रातील बॅकलॉग विषयांची लेखी परीक्षा पारंपारिक पध्दतीने घेण्यात येईल. विशेष बाब म्हणून सर्व विद्याशाखांतील सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल ५० टक्के अंतर्गत गुण/इनसेमीस्टर/सेशनल इ. व ५० टक्के शेवटच्या सत्रात घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षांच्या एकत्रित मूल्यमापनावर आधारीत असतील. सदर तरतूद केवळ विद्यमान शैक्षणिक सत्रापुरती असेल.

२) सदर विद्यार्थ्यांच्या नियमित व बॅकलॉग प्रात्याक्षिक/मौखिक परीक्षा/प्रोजेक्ट परीक्षा इत्यादीची व्यवहार्यता तपासून अंतर्गत मुल्यांकनाद्वारे अथवा व्हीडीओ कॉन्फरन्सींगद्वारे घेण्यात येतील.

३) विद्यार्थ्यांना ज्या विषयांची परीक्षा द्यावयाची आहे त्याची तपशिलवर माहिती खालीलप्रमाणे:

- दोन वर्षीय अभ्यासक्रमांमध्ये चौथ्या सत्राचे विद्यार्थी व चौथ्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र १, २ व ३ मधील बॅकलॉगचे विषय असतील, अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
- तीन वर्षीय अभ्यासक्रमामध्ये सहाव्या सत्राचे विद्यार्थी व सहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ३, ४ व ५ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
- चार वर्षीय अभ्यासक्रमामध्ये आठव्या सत्राचे विद्यार्थी व आठव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ५, ६ व ७ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.
- पाच वर्षीय अभ्यासक्रमामध्ये दहाव्या सत्राचे विद्यार्थी व दहाव्या सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांना सत्र ७, ८ व ९ मधील बॅकलॉगचे विषय असतील अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा होणार आहेत.

**ड) पुढील शैक्षणिक वर्षात आश्वासित प्रवेश (Carry Forward)**

१) अंतिम वर्षाचे विद्यार्थी वगळता इतर सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात/सत्रात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजले जाईल. सदर तरतूद केवळ विद्यमान शैक्षणिक वर्षापुरती असेल.

२) मागील शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या (Year Down) विद्यार्थ्यांना उपरोक्त तरतूदीनुसार पुढील शैक्षणिक वर्षात/सत्रात प्रवेश घेण्यासाठी पात्र समजले जाईल.

३) उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांनी ते गैरहजर असणा—या किंवा अनुत्तीर्ण झालेल्या विषयांच्या परीक्षा जेव्हा त्या परीक्षांचे आयोजन होईल तेव्हा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**इ) इतर तरतूदी**

१) विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयाच्या अधीन राहून उपरोक्त घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी सर्वअधिनस्त महाविद्यालये व परीसंस्था हे परीक्षा केंद्र म्हणून राहतील.

२) ज्या विद्यार्थ्यांनी क्लास इम्प्रुव्हमेंटसाठी अर्ज केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची परीक्षा पुढे नविन सत्र सुरु झाल्यानंतर १२० दिवसांच्या कालावधीत घेण्यात येईल. त्यासाठी पुन्हा परीक्षा आवेदनपत्र भरण्याची आवश्यकता असणार नाही.

३) उपरोक्त नमूद सर्व प्रकारची कार्यवाही करताना कोव्हिड १९ प्रादुर्भाव प्रतिबंधक उपाययोजना तसेच यासंदर्भात शासनाच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घेणे अनिवार्य आहे.

उपरोक्त सर्व नमूद बाबी विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या शंकांचे निरसन करण्यासाठी आहेत. या सर्व बाबीं सक्षम प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी ठेवून, प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच उपरोक्त बाबींमध्ये झालेले बदल आपणांस सूचित करण्यात येतील.

16/5/2020

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

संदर्भ: परीक्षा समन्वय/३०९
दिनांक: १६ मे, २०२०

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:—**

सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, विद्यापीठ परिसर, प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालय व संस्था—यांना विनंती की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांच्या निर्देशनास आणून देण्यात यावे.